महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/अ/किमान वेतन/४४८४ दिनांक : ०८.०२.२०१६

## परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारीत दराबाबत.

संदर्भ :१) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.काऔसंवि/अ/३३१७, दि. १.२.२०१०.
२) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.काऔसंवि/अ/२३८८०, दि. २३.८.२०१२.
३) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.औसंवि/अ/३१६७७, दि. २०.८.२०१५

********

क्षेत्रीय कार्यालयामार्फत कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता असावी यासाठी संदर्भीय परिपत्रक क्र. ०१ अन्वये किमान वेतनाबाबत सविस्तर मार्गदर्शन व वरील संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये सुधारीत सुचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वरील संदर्भ क्र. ०३ नुसार किमान वेतना सोबत द्यावयाच्या सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१.०७.२०१५ ते दि. ३१.१२.२०१५ या कालावधीकरिता दिलेले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम -१९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेल्या अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१६-१/कार्या १० दि. ०४.२.२०१६ अन्वये किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय **सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३०.०६.२०१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.**

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ – १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | २९५३.८० | २९५३.८० | २९५३.८० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील. सदर सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३०.०६.२०१६ या कालावधीकरिता लागू आहेत.

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना दि. ०१.०१.२०१६ पासून लागू केलेल्या सुधारीत विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे फेब्रुवारी- २०१६ च्या वेतनामध्ये ठेकेदाराकडून अदा केल्याशिवाय ठेकेदाराची देयके अदा करु नये यांची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संजय ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत : प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत सर्वांना.

D:\archana\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc